# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०५/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

## अवैध्यरीत्या गाई गौवंशाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक १४/०५/२०२४ रोजी चे २१/३० वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो.स्टे. हद्दीत अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा कडुन नागपूर च्या दिशेने NH-53 महामार्गाने महेंद्रा झायलो वाहन क्र. MH-46/P -6416 मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत आहे. अशी माहिती मिळाल्याने नमूद वाहणाचा पाठलाग करून मौजा वडोदा शिवारात वडोदा पुलावर नमूद वाहनाला पकडून पाहणी केली असता महेंद्रा झायलो वाहन क्र. MH-46/P-6416 मध्ये ७ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने वाहन चालक नामे – अहबाज निसार खान, वय २९ वर्ष, रा. चंगेरा ता. जि. गोंदिया यास ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातून ७ गोवंशिय जनावरे किंमती ७०,०००/– रू व महेंद्रा झायलो वाहन क्र. ५,००,०००/–रु. तसेच एक मोबाईल फोन किंमत १०,०००/– रू. असा एकूण ५,८०,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर वाहना मधील गोवंशिय जनावरांना योग्य व्यवस्थापनार्थ गोरक्षण केंद्र भंडारा येथे दाखल करण्यात आलेले आहे. आरोपी वाहन चालक अहबाज निसार खान व फरार आरोपी अशपाक खान, वय २७ वर्ष, रा. चंगेरा ता. जि. गोंदिया यांचे विरुद्ध कलम ११(१) (ड) प्रा. छळ प्रति. अधि.१९६० सहकलम ५ अ (१),९ महा. प्रा. सं. अधि.१९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार व पो.नि. सतीशसिंह राजपूत, पो.उपनी महेश बोथले पोहवा. गणेश मुदमाळी, हरीश यंगलवार, पो.अ अतुल निंबरते, अतिश गाढवे यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर